**<u>प्रेस नोट</u>** **दि.१३/०५/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वेश्या व्यवसायातून पर राज्यातील मुलीची सुटका

दि.१०/०५/२०१८ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल दिनेश शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अजय हिरेमठ उर्फ कानडी नावाचा एजंट हा वेगवेगळया हॉटेलमध्ये मुली ठेवून स्वतः तसेच त्याचे एजंट साथीदारांच्या साहाय्याने मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून ग्राहकांच्या मागणीनुसार मुली कोरेगाव पार्क येथील हॉटेलवर वेश्या गमनासाठी पाठवितो व तो एजंट वेश्या गमनाकरिता आलेल्या मुली मार्फत अथवा त्याचे साथीदाराकडून वेश्या गमनाचे पैसे स्वीकारतो. त्यातून स्वतःसाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची उपजीविका भागवितो. तो कोरेगाव पार्क भागात ग्राहकांच्या मागणीनुसार वेगवेगळया ठिकाणी मुली पुरवितो व तो वेश्या व्यवासाय चालवितो, अशी बातमी मिळाल्याने सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे यांना तात्काळ कळविली असता पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह **सेंट लॉर्न हॉटेल, कोरेगाव पार्क, पुणे** येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये पश्चिम बंगाल येथील पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून अजय हिरेमठ उर्फ कानडी, नितीन व हंसराज शिंदे हे वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे समजले असून, सदर मुलगी ही पश्चिम बंगालमधील गरीब घरातील आहे. तिचा गरीबीचा फायदा घेवून, तिला पैशाचे आमिष दाखवून महाराष्ट्रामध्ये आणून तिचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत आहेत, असे तपासात निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे, श्री.गणेश माने, पो.नि. (गुन्हे) कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे व त्यांचे पथकाने कारवाई केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे